जा.क.उमाशि/शिमा/इ.११वी प्रवेश/२०१६-१७
शिक्षण उपसंचालक, कार्यालय, पुणे
दिनांक - ०९.०४.२०१६

प्रति,
प्राचार्य/प्राचार्या,
पुणे व पिंपरी चिंचवड शहर

विषय : इ.११वी ऑनलाईन प्रवेश २०१६-१७ कनिष्ठ महाविद्यालय नोंदणीबाबत

इ.११वी ऑनलाईन प्रवेश २०१६-१७ साठीची कनिष्ठ महाविद्यालयाचे नोंदणी कामकाज दि.०६.०४.२०१६ ते दि. ०९.०४.२०१६ या कालावधीत एस.एम.जोशी महाविद्यालय, हडपसर, पुणे येथे करण्यात आले होते.

शैक्षणिक वर्ष २०१६ - १७ करिता ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी (अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित/स्वयं अर्थसहाय्यीत)अद्याप आपल्या कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी केलेली नाही, अशा महाविद्यालयांनी दि.११.०४.२०१६ रोजी उपरोक्त महाविद्यालयात समक्ष नोंदणी करणेसाठी आवश्यक ती कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, आणि कनिष्ठ महाविद्यालय नोंदणी करून घ्यावी.

दि.११.०४.२०१६ नंतर कोणत्याही परिस्थितीत प्रलंबीत राहणा-या कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी केली जाणार नाही, व त्याची सर्वस्वी जबाबदारी सदर कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.जे कनिष्ठ महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०१६ - १७ साठी नोंदणी करणार नाही त्या कनिष्ठ महाविद्यालयाची शैक्षणिक वर्ष २०१५ - १६ ची माहिती(त्यांनी नोंदविलेली)माहिती प्रवेश पुस्तीकेत नमुद करण्यात येईल

ज्या वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदणी केलेली आहे, तथापि २० टक्के इनहाऊस कोटा नोंदणी झालेली नाही अशा कनिष्ठ महाविद्यालयांनी सुदधा दि.११.०४.२०१६ रोजी उपरोक्त महाविद्यालयात उपस्थित राहून २० टक्के इनहाऊस कोटा प्रवेशाची नोंदणी करून घ्यावी.

MRaut

(मिनाक्षी राऊत)
सहाय्यक शिक्षण संचालक
पुणे विभाग, पुणे - १.